# महर्षि अण्णासाहेब कर्वे

## १०५ वर्षांचें जीवन दर्शन

प्रकाशन : १८ एप्रिल १९६३
( १०६ वा जन्मदिवस )

923.754
M Kar/Nit
27008

*एकमेव वितरक*
**ओरिएंट लाँगमन्स लिमिटेड**
**रजिस्टर्ड ऑफिस** – १७ चित्तरंजन ॲव्हेन्यू, कलकत्ता १३
निकल रोड, बॅलर्ड एस्टेट, मुंबई १
**इतर कचेऱ्या** – मद्रास व नवी दिल्ली
**डेपो** – ३७३/७४ नारायण पेठ, पुणें २
अहमदाबाद, बेंगलूर, हैद्राबाद व डाका

© हिंगणें स्त्री-शिक्षण संस्था, पुणें ४
प्रथम प्रकाशन : एप्रिल १९६३

श्री. रामकृष्ण किसन धोटे यांनी बॉम्बे फाइन आर्ट ऑफसेट ॲण्ड लिथो वर्क्स्, मुंबई २७, येथे छापलें, आणि श्री. केशव रामचंद्र पालकर, चिटणीस, हिंगणें स्त्री-शिक्षण संस्था, पुणें ४ यांनी प्रसिद्ध केलें.

# प्रास्ताविक

मुंबईचे दानशूर धनिक श्री. मोतीचंद शहा यांच्या उदार देणगीमुळे हिंगणें येथे १९५९ सालीं 'महर्षि कर्वे वस्तु-संग्रहालय' बांधण्यांत आलें. त्यांत महर्षींचे पुतळे, फोटो, मानपत्रें व इतर वस्तु ठेवण्यांत आल्या. मुंबईचे सुप्रसिद्ध आर्किटेक्ट श्री. लक्ष्मण विष्णु साठे यांनी १९६१ मध्ये संस्थेस भेट दिली त्यावेळी हें वस्तु-संग्रहालय पाहिलें. थोड्या दिवसांनी, जनतेला महर्षींचें व त्यांच्या कार्याचें दर्शन कोठेहि सहज मिळावें म्हणून या चित्ररूपदर्शनाची अभिनव कल्पना पुढे मांडली. ती १८ एप्रिल १९६३ पर्यंत सफल व्हावी म्हणून त्यांनी स्वतः भरीव देणगीहि देऊं केली.

महर्षींच्या निधनाच्या दिवशीं श्री. साठे अंत्यदर्शनाला आले होते त्यावेळी त्यांनी आपली योजना लवकर पुरी व्हावी अशी इच्छा पुन्हा व्यक्त केली. त्यामुळे गुरुवर्यांच्या १०६ व्या जन्मदिवशीं हें 'चित्ररूप-दर्शन' प्रसिद्ध करण्याचा संस्थेने संकल्प सोडला. अनेकांच्या उत्स्फूर्त सहकार्याने हें काम पुरें होत आहे याबद्दल समाधान वाटतें. महर्षि कर्वे यांच्या थोर कार्याचें दर्शन चालू व पुढील पिढ्यांना या पुस्तकामुळे होत राहील असा भरंवसा वाटतो.

# ऋण निर्देश

*मूळ कल्पना व रु. ५००० ची देणगी*

**श्री. लक्ष्मण विष्णु साठे**, ए. आर्. आय्. बी. ए., चार्टर्ड आर्किटेक्ट, मुंबई ५२

*योजना व सजावट*

**श्री. मनोहर जोशी**, आर्ट डायरेक्टर, मार्केटिंग ॲडव्हर्टाइझिंग असोशिएट्स्, मुंबई

*फोटोग्राफी*

**स्टूडिओ आर. आर. प्रभु**, मुंबई

*संपादन*

**श्री. यशवंत गोपाळ निरगुरे**, संपादक, 'नवें जग', पुणें २

*टाइपाची जुळणी*

**कन्सॉलिडेटेड प्रिंटर्स**, मुंबई १२

**कर्नाटक मुद्रणालय**, मुंबई २

*छपाई*

**श्री. रामकृष्ण किसन घोटे**, बॉम्बे फाइन आर्ट ऑफसेट ॲण्ड लिथो वर्क्स्, मुंबई २७

*अनुदान : रु. ५०००*

**शिक्षण खातें, महाराष्ट्र सरकार**

*फोटो*

**श्री. शाम किलांजार**, मुंबई

**श्री. अरविंद आठवले**, पुणें ४

**'सकाळ'**, पुणें २

**किर्लोस्कर मासिकें**, पुणें २

**कर्वे गौरव समिति, मुरूड**

**श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठ**, मुंबई

**फिल्म्स डिव्हिजन, भारत सरकार**, मुंबई

व इतर कित्येक मित्र

या सर्वांची व इतर असंख्य साह्यकर्त्यांची हिंगणें स्त्री-शिक्षण संस्था अत्यंत आभारी आहे.

# महर्षींचें कृतार्थ जीवन


रूढीच्या बंधनांत जखडलेल्या भारतीय स्त्रीच्या मुक्तीसाठी व उन्नतीसाठी अण्णासाहेब कर्वे यांनी जन्मभर उग्र तपश्चर्या केली. त्यांच्यासारख्या तपस्व्याच्या प्रयत्नांची कहाणी अनेक अद्भुत व स्फूर्तिदायक प्रसंगांनी भरलेली आहे.



डॉ. धोंडो केशव कर्वे

या झोपडीने अण्णांच्या कार्याचे अनेक टप्पे पाहिले आहेत. विधवांचें शिक्षण, कुमारिकांचें शिक्षण, महिलाविद्यापीठाची स्थापना, इत्यादि कार्यांची उभारणी या झोपडीने पाहिली असून अण्णांच्या आशा-आकांक्षांना तिने अखेरपर्यंत साथ दिली.






अण्णांनी आपल्या कार्याची सुरुवात हिंगणें येथे १९०० सालीं एका लहानशा झोपडींत केली. हळूहळू त्या कार्याचा विस्तार होत गेला.

## दोन महात्म्यांची भेट

अण्णांच्या कार्याचा लौकिक ऐकून महात्मा गांधी हिंगण्याची संस्था पाहण्यास दोनदा आले होते. मानवतेच्या ह्या दोघा थोर सेवकांच्या भेटीचे हे प्रसंग अपूर्व होते.











महिलाश्रम हाय



## अण्णांची तेजस्वी सहचारिणी

अण्णांच्या यशांत ज्या स्त्रीने मोलाचा वाटा उचलला त्या या सौ. आनंदीबाई ऊर्फ बाया कर्वे. यांच्याशीं अण्णांचा पुनर्विवाह झाल्यामुळे त्यांना आपल्या जीवनकार्याचें क्षेत्र सापडलें.

सौ. आनंदीबाई (बाया) कर्वे (१८६५ – १९५०)

स्त्रीजीवनाकडे पाहण्याची अण्णांची दृष्टि विशाल व वास्तववादी होती.
गृहजीवनाची तयारी व समाजाची सेवा ज्यामुळे साधेल असें शिक्षण
स्त्रीला देण्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या संस्थांची उभारणी केली.









अत्युच्च आनंदाचा क्षण






*पंडित जवाहरलाल नेहरू* *भारतरत्न डॉ. कर्वे*

प्रथम अण्णांचा छळ झाला परंतु नंतर जनतेने त्यांच्यावर फार प्रेम केलें आणि 'महर्षि' ही पदवी अर्पण करून आपली कृतज्ञता व्यक्त केली.

*राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद यांजकडून भारतरत्न पदवीचा स्वीकार*

भारतरत्न पदक




भारतांतील सर्वोच्च मानाचे मानकरी होण्याचें भाग्य अण्णांना १९५८ सालीं लाभलें. लोकमान्यतेबरोबर राजमान्यता मिळाली.




पद्मविभूषण पदक
१९५५

अण्णांचा जन्मशताब्दि समारंभ १८ एप्रिल १९५८ रोजीं देशभर उत्साहानें साजरा झाला. त्या प्रसंगी लहानथोरांनी आपल्या आदराच्या भावना व्यक्त केल्या. दिल्ली येथील समारंभांत राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणाले, "विपरीत परिस्थितींतहि श्रद्धा व चिकाटी यांच्या बळावर मनुष्य केवढें प्रचंड कार्य करूं शकतो याचें डॉ. कर्वे मूर्तिमंत उदाहरण आहेत." पंडित गोविंद वल्लभ पंत यांनी डॉ. कर्वे यांच्या गौरवपर भाषणांत सांगितलें, "तेलंग, रानडे, गोखले आणि टिळक या थोर महाराष्ट्रियांच्या परंपरेंतील डॉ. कर्व्यांनी आपल्या थोर कार्यानें लोकांपुढें आदर्श ठेवला." श्री. मोरारजीभाई देसाई म्हणाले, 'डॉ. कर्व्यांनी स्त्रियांचा केलेला उद्धार स्वातंत्र्याच्या मोलापेक्षा अधिक आहे."


मुंबई येथील प्रचंड सभेंत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले, "आजच्यासारखा आगळा प्रसंग यापूर्वी माझ्या आयुष्यांत आला नाही. तुमच्या आयुष्यांतहि आला नसेल, यापुढेंहि येईल असें वाटत नाही.

"डॉ. कर्वे हे एखाद्या प्राचीन ऋषीमुनीप्रमाणे वाटतात. मी येथे महर्षींचें अभिनंदन करण्यास आलों नाही. त्यांचें अभिनंदन करणारा मी कोण? व तुम्हीतरी कोण? महर्षींचे आशीर्वाद मागण्याकरिता मी आलों आहें. त्यांचे आशीर्वाद आम्हांला हवे आहेत. त्यांची सेवावृत्ति, निष्ठा, साहस, चिकाटी हे गुण आम्हांस हवे आहेत."

## जीवनप्रवासाची सुरुवात




अण्णांच्या जीवनाची सुरुवात १८ एप्रिल १८५८ रोजीं कोकणांतील एका लहानशा गावीं झाली.



हेंच तें मुरूड गाव. निसर्गरम्य वातावरणांत वसलेल्या या गावावर सौंदर्याची व संस्कृतीची कृपा होती ; पण तेथे दारिद्र्य खूप होतें.



वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत मुरूडमध्येच अण्णा लहानाचे मोठे झाले. धूळपाटीनेच त्यांना श्रीगणेशा शिकविला; तिनेच त्यांच्या अंतःकरणांत ज्ञानाची ज्योत प्रज्वलित केली.





अण्णांचे बंधुभगिनी व बालमित्र
*अंबाताई, भिकाजीपंत, बाळकृष्णपंत आचवल*

*रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक*

मुरुडने निर्माण केलेले हे अलौकिक गृहस्थ देशभक्तीचा व सुसंस्कृतपणाचा आदर्श होते आणि विद्यार्थीदशेंत अण्णांचे स्फूर्तिस्थान होते.

## समाजसेवेचें बाळकडू

प्राथमिक शाळेंतील शिक्षक सोमण गुरुजी तर अण्णांचें दैवत होते. चारित्र्य, लोकसेवा व निःस्वार्थीपणा हे गुण त्यांनीच अण्णांना दिले आणि सार्वजनिक कार्यांचे धडे गिरवून घेतले.




सामायिक भांडवलाचें दुकान

देवळांत लोकांकरिता वृत्तपत्र वाचन

## एक रोमांचकारी प्रसंग

अण्णांच्या ज्ञानसाधनेंत अनंत अडचणी येत गेल्या. सहाव्या इयत्तेच्या परीक्षेसाठी भर पावसाळ्यांत तीन दिवसांत १२५ मैल अंतर पायी तोडून ते सातान्याला गेले.



*कुंभार्ली घाटांतील अरुंद पायवाट*



## इंग्रजी शिक्षणाची तळमळ


आपण उच्च इंग्रजी शिक्षण घ्यावें ही अण्णांची आकांक्षा! पण विसावें वर्ष लागलें तरी फारशी प्रगति झाली नव्हती. म्हणून त्यांनी कोकण सोडून १८७८ सालीं मुंबईकडे धाव घेतली. या मुंबईने अंसख्य कोकणी मुलांना भाग्यकाल दाखविला.







अण्णांचें मुंबईतील जीवन म्हणजे उग्र तपस्याच होती. गॅलरींत झोपावें, स्वतःचें अन्न शिजवावें व शिकवण्यांवर पैसे मिळवावे, असे रात्रंदिन काबाडकष्ट करून अण्णा विद्यादेवीची आराधना करीत होते. १८८१ सालीं ते मॅट्रिक झाले.



We, the Chancellor, Vice-Chancellor and Fellows of the University of Bombay Certify that the Degree of

**Bachelor of Arts**

Karve Dhondo Keshav

has been conferred on the withinsigned Karve Dhondo Keshav of Elphinstone College at Bombay, on the twentieth day of the month of January in the year eighteen hundred and eighty-five

In Testimony whereof are set the Seal of the said University and the Signature of the said Chancellor.

[illegible]

Vice Chancellor



पुढे एल्फिन्स्टन कॉलेजांत अण्णा दाखल झाले. पूर्वीची उग्र तपश्चर्या चालवून १८८४ सालीं वयाच्या २७ व्या वर्षी ते बी. ए. झाले.



*श्री. नरहर बाळकृष्ण जोशी*

मुंबईतील विद्यार्थीदशेच्या काळांत ज्या वर्गमित्राच्या स्वभावाचा, विचारांचा व कर्तृत्वाचा प्रभाव अण्णांवर पडला ते हे तेजस्वी चारित्र्यशील, असामान्य गृहस्थ. पुढे जन्मभर अण्णा कृतज्ञतेने यांच्यासंबंधी आठवणी सांगत.

# समाज-सुधारणेचा खडतर मार्ग



शिक्षण संपलें. पुढे काय ? सरकारी नोकरी आणि गृहस्थाश्रमांतील सुख व आराम ? पण अण्णांची प्रवृत्ति वेगळी बनली होती. त्यांनी हालअपेष्टांचाच मार्ग पुन्हा स्वीकारला.





रानडे



दादाभाई नौरोजी




गोखले



आगरकर

भारतांतील तरुणांपुढे त्यावेळी ज्या लोकाग्रणींचीं दैदीप्यमान उदाहरणें होतीं, ते हे भारताचे सुपुत्र. अण्णांना यांच्या विचारांतून लोकसेवेची स्फूर्ति मिळाली.



*शिक्षणदानाकडे*

सरकारी नोकरी न पत्करतां
शिक्षणकार्याला वाहून घेण्याची वाट
टिळक व आगरकर यांनी निर्माण केली.
अण्णा तिकडेच आकृष्ट झाले.





राधाबाई

शिक्षणदानाच्या पवित्र कार्याकडे वळलेल्या अण्णांसारख्या तरुण व उत्साही ध्येयवाद्याच्या आशा-आकांक्षांना ऑगस्ट १८९१ मध्ये जबरदस्त धक्का बसला. कोकणांतून अवचित-पणें एक पत्र आलें व त्यांची प्रिय पत्नी निवर्तल्याचें समजलें.



गद्रे वाडा येथें फर्ग्युसन कॉलेज सुरू झालें



प्रो. गोपाळ कृष्ण गोखले

राधाबाईंच्या मृत्यूने दुःखी झालेल्या अण्णांना सुमारे महिना दीड महिन्यांतच एक नवें आशास्थान निर्माण झालें. कर्तृत्वाला क्षेत्र लाभलें. प्रो. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या निमंत्रणावरून १५ नोव्हेंबर १८९१ रोजीं अण्णा फर्ग्युसन कॉलेजांत गणिताचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले.




राधाबाईच्या मृत्यूमुळे अण्णांपुढे पुन्हा विवाह करण्याचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन प्रथेप्रमाणे अल्पवयीन कुमारिकेशीं विवाह करावयास अण्णांचें मन तयार होईना. विधवांचीं दुःखें पाहून त्यांना कळवळा वाटे.

विधवांच्या शिक्षणासाठी पंडिता रमाबाई या अलौकिक स्त्रीने 'शारदासदन' ही संस्था चालविली होती. त्यांत शिकणाऱ्या एका विधवेला अण्णा ओळखीत होते.



पंडिता रमाबाई



शारदासदनांतील विद्यार्थिनी

शारदासदनांतीलही विधवा नरहरपंत या अण्णांच्या मित्राची धाकटी बहीण. हिच्याशीं अण्णांचा विवाह १२ मार्च १८९३ रोजीं पुण्यांत सुधारकाग्रणी प्रिन्सिपल आगरकर यांच्या उपस्थितींत साजरा झाला.



धोंडो केशव कर्वे

आनंदीबाई कर्वे ( बाया )



बायाचे आई-वडील हे सनातनी परंपरेचे. तथापि त्यांनी मुलीच्या पुनर्विवाहाला संमति दिली. भोवतालचा समाज मात्र टीकेचे अंगार टाकीत होता.



*श्री. बाळकृष्ण केशव जोशी व सौ. मनोरमाबाई* (बायाचे वडील व आई)





पुनर्विवाहित पत्नीसह अण्णा १८९३ सालीं जन्मगावीं गेले तेव्हां सनातनी वर्ग खवळून उठला. अण्णांवर बहिष्कार टाकण्यांत आला व कुटुंबियांची मानहानि करण्यांत आली.



पुनर्विवाहित कुटुंबमेळा

स्वतः पुनर्विवाह केल्यामुळे अण्णांच्या समाजकार्याच्या प्रवृत्तीला एकाएकी नवी दिशा लागली. पुनर्विवाहासाठी संघटितपणें लोकमत तयार करण्याची विशेष जबाबदारी आपणांवर येऊन पडली, असें त्यांच्या भाविक मनाने घेतलें. २१ मे १८९४ रोजीं त्यांनी पुनर्विवाहितांचा पहिला कुटुंबमेळा भरविला.



*फर्ग्युसन कॉलेज संमेलन (१८९४)*


*खुर्चीवर बसलेले : प्राध्यापक कर्वे, गोखले, भानू, अभ्यंकर, चांदोरकर, आगरकर, केळकर, गोळे, लिमये, भाटे, लेले*

फर्ग्युसन कॉलेजांतील आपल्या थोर सहकाऱ्यांच्या सहवासांत अण्णांची विधवांच्या कार्याची प्रेरणा अधिकच प्रज्वलित होत गेली.

# स्त्रियांचा कैवारी


स्त्रियांच्या उद्धारासाठी कांहीतरी प्रत्यक्ष कार्य करून दाखविण्याची अण्णांमधील प्रेरणा हळू हळू प्रबळ होत चालली. त्यांनी नवे विचार मांडले, अनेक संस्था काढल्या व यशस्वी करून दाखविल्या.





## मिशनरी वृत्तीने प्रचार

मिशनऱ्याप्रमाणे अण्णांनी आपल्या कार्याचा ध्यास घेतला. त्यांची प्रचाराची पद्धत अद्भुत होती. चारित्र्य शुद्ध होतें; उत्कटता प्रचंड होती; एकरूपता अपूर्व होती.



१८९८ सालीं एका विधवेला आश्रय देऊन अण्णांनी आश्रमाच्या कार्याला पुण्यांत सुरुवात केली. पुढे १९०० सालीं हिंगणें येथे संस्थेची उभारणी एका लहानशा झोपडींत केली, मोठमोठ्या अद्ययावत् इमारतींच्या सान्निध्यांतहि या मूळ झोपडीचें वैभव आगळेंच आहे.



*रा. ब. गणेश गोविंद गोखले*

हिंगणें येथील संस्थेची स्थापना या उदारचरित सद्गृहस्थांच्या पहिल्या देणगीमुळे झाली. त्यांनी सहा एकर जागा व साडेसातशे रुपये १९०० सालीं दिले.




*डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर*

'अनाथ बालिकाश्रमाची मंडळी' या अण्णांनी १८९६ मध्ये स्थापन केलेल्या संस्थेचे पहिले अध्यक्ष. पुढे १९१६ सालीं महिलाविद्यापीठ स्थापन झालें त्याचेहि पहिले कुलपति हेच होते.



*अनाथ-बालिकाश्रमाची इमारत ( १९०४ )*

विधवांसंबंधीच्या कामाची प्रगति होण्यांत अडचणी अनेक होत्या. प
अण्णांची चिकाटी जबरदस्त होती. त्यामुळेच १९०४ सालीं हिं
येथे आश्रमासाठी इमारत बांधणें शक्य झालें.



*महिला-विद्यालय ( १९१२ )*

१९०७ सालीं अण्णांनी कुमारिकांसाठी काम सुरू केलें. त्याकरिता स्व
इमारत १९१२ सालीं हिंगणें येथेच बांधली. त्यावेळी विद्यालयांत
मुली शिकत होत्या.



श्री. पार्वतीबाई आठवले ( आद्य आजन्मसेविका )



श्री. वेणूबाई नामजोशी
( पहिल्या कालांतील आजन्मसेविका )

वयाच्या २५ वर्षांनंतर मुळाक्षरें शिकण्यास सुरुवात करणारी ही कर्तबगार स्त्री प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजचें शिक्षण प्रथम श्रेणींत पूर्ण करून १९०२ सालीं आश्रमाची आजन्मसेविका झाली. १९१८ सालीं पार्वतीबाई अमेरिकेस गेल्या व तीन वर्षे तेथे राहिल्या. संस्थेच्या प्रगतीस त्यांनी मोलाचा हातभार लाविला.



श्री. काशीबाई देवधर
( पहिल्या काळांतील आजन्मसेविका )



श्री. यमुनाबाई साने ( विद्यार्थिनी आजन्मसेविका )
आता – डॉ. सौ. लेडी इंदिराबाई नियोगी
हिंगणें स्त्री-शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष



श्री. कमलाबाई गरुड
( झोपडींतील पहिली विधवा विद्यार्थिनी )



श्री. रमाबाई सोमण
( अण्णांची गुरुपत्नी व आश्रमांतील विद्यार्थिनी )



*डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजन्मसेवक (१९०९)*
*बसलेले–पटवर्धन, पानसे, लिमये, लेले, गोखले, भानू, कर्वे, देवधर, राजवाडे*
*उभे — कोल्हटकर, गुणे, नाईक, द्रवीड, परांजपे, लिमये, कानिटकर, काळे, भाटे, दीक्षित.*

फर्ग्युसन कॉलेजांत गणिताचे प्राध्यापक म्हणून अण्णा लोकप्रिय होते. तेथील काम संभाळून अण्णा हिंगणें येथील कार्याची उभारणी परिश्रम-पूर्वक करीत होते.

# महिला-विद्यापीठाचे संस्थापक

महिला-विद्यापीठाचें बोधचिन्ह



धोंडो केशव कर्वे

महिलांच्या विकासाला व आकांक्षांना जास्तीत जास्त वाव मिळावा या हेतूने जून १९१६ मध्ये अण्णांनी महिला-विद्यापीठाची हिंगणें येथे स्थापना केली. सुरुवातीस फक्त पाच विद्यार्थिनी होत्या.

महिलांचें आदर्शशिक्षण कसें असावें यासंबंधी अण्णांचें चिंतन नेहमी चालू असे. ऑगस्ट १९१५ मध्ये जपानमधील महिला-विद्यापीठासंबंधींचें पत्रक त्यांच्या पाहाण्यांत आलें. त्यामुळे अण्णांच्या विचारांना जोराने चालना मिळाली. सामाजिक परिषदेच्या अध्यक्षीय भाषणांत त्यांनी भारतीय महिला-विद्यापीठाची आपली योजना जनतेपुढे ठेवली.





अखिल भारतीय सामाजिक परिषदेचे अध्यक्ष
( डिसेंबर १९१५ )

मुंबईच्या भाषणानंतर अवघ्या सहा महिन्यांत महिला-विद्यापीठाची सुरुवात हिंगणें येथे झाली.



पहिला प्राध्यापकवर्ग व विद्यार्थिनी

विद्यार्थिनी : कु. रेवती केतकर ( सौ. कर्वे ), श्री. सीताबाई अण्णिगेरी, कु. येसू गाडगीळ ( सौ. आजरेकर ), कु. यमू पटवर्धन

प्राध्यापक : दिवेकर, चिपळूणकर, शांताबाई हेर्लेकर, कर्वे, जोशी, आठवले



श्री. वारूबाई शेवडे ( पहिली पदवीधर )

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी



सर विठ्ठलदास ठाकरसी



महिला-विद्यापीठाच्या कार्याकडे सर विठ्ठलदास ठाकरसी आकृष्ट झाले. आपल्या मातोश्री श्रीमती नाथीबाई यांच्या स्मरणार्थ पंधरा लाख रुपयांची देणगी त्यांनी दिली.




*सर होरमसजी वाडिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेला इमारतीचा उद्घाटन समारंभ*

महिला-विद्यापीठाच्या कार्याची लोकप्रियता हळूहळू वाढत होती. १९२३ सालीं महिला-पाठशाळेची इमारत बांधण्यांत आली.

शालेय शिक्षणहि विद्यापीठाच्या धोरणाने व्हावें म्हणून १९१८ सालीं पुण्यांत कन्याशाळेची स्थापना प्रो. गो. म. चिपळूणकर यांनी केली.



*श्री. ना. दा. ठा. कन्याशाळेची विठ्ठल राघोबा लांडे इमारत.*

# जगप्रवास



27008

*अमेरिकेच्या वाटेवर*

वयाच्या ७१ व्या वर्षी कर्मयोगी अण्णा त्रिखंड प्रवासास निघाले. इंग्लंड, जर्मनी, अमेरिका, जपान, वगैरे देशांचा दौरा त्यांनी केला. नंतर १९३१ मध्ये ते आफ्रिकेस गेले. प्रत्येक ठिकाणीं त्यांनी विद्यापीठाचा यशस्वी प्रचार केला.

परदेशच्या दौऱ्यांत ज्या ज्या देशांत अण्णा हिंडले तेथे तेथे लोकांनी त्यांचें स्वागत केलें. त्यांचे परिपक्व विचार ऐकण्यास लोक उत्सुकतेने जमत.










कमलाबाई चट्टोपाध्याय यांच्याबरोबर

सॅन्डाउन् ( आइल ऑफ वाइट )
इंग्लंडमधील हिंदी विद्यार्थ्यांसमवेत



। (स्वित्झर्लंड) व एल्सिनोर (डेन्मार्क) येथील
क शैक्षणिक परिषदांना अण्णा हजर राहिले.



बर्लिन येथील एका शिशुगृहाला अण्णांनी भेट दिली, त्या वेळचा फोटो.

बर्लिनमधील मुक्कामांत जगद्विख्यात् प्रो. आइन्स्टाइन यांच्याशीं अण्णांनी चर्चा केली. दोघा महापुरुषांची ही भेट अपूर्व होती.





सौ. इरावती कर्वे, डॉ. कर्वे, डॉ. फिशर

एका इंग्लिश कुटुंबांत



वेगवेगळ्या थरांतील मंडळींना अण्णा भेटत होते. तिकडच्या देशांतील उच्च दर्जाचें कार्य पाहून अण्णांच्या अनुभवांत भर पडली.



बर्लिनमधील गृहविज्ञानाच्या शाळेस भेट



अमेरिकेंतील पिट्सूबर्ग शहरांतील कुटुंबाचे पाह



शांघाय

भारताला परत येतांना १९३० सालीं अण्णा जपानमध्ये तीन आठवडे राहिले. टोकिओमधील जपान विमेन्स युनिव्हर्सिटीला त्यांनी भेट दिली.



जपान विमेन्स युनिव्हर्सिटींत प्रेसिडेंट आसो यांच्यासह

# कार्याचा पुढील टप्पा

आपल्या तरुणपणाच्या कार्याला यश येत चाललेलें पाहण्याचें भाग्य अण्णांना उत्तरोत्तर लाभत गेलें. १९३४ नंतर संस्थांच्या दैनंदिन कार्यांतून त्यांनी लक्ष काढलें. आता समाजांतील नव्या समस्यांकडे ते आस्थेने लक्ष देऊं लागले.



महिला विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाची-मिरवणूक



*अण्णा आभार मानीत आहेत.*



देशांतील धुरीणांचें लक्ष विद्यापीठाने अल्पावधींतच खेचून घेतलें. विद्यापीठाने निर्माण केलेल्या पदवीधर स्त्रियांमध्ये वेगळा आत्मविश्वास दिसून येऊं लागला.

आजचे राष्ट्राध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली १९४२ मध्ये महिला विद्यापीठाचा रौप्यमहोत्सव साजरा झाला. पुढे १९५२ सालच्या पदवीदानसमारंभांत त्यांनी पदवीधरांना उपदेश केला.




*श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठाची मुंबईतील इमारत.*

यांनी १९५० सालापासून विद्यापीठाच्या कार्यांत आस्थेने भाग घेण्यास सुरुवात केली. १९५७ सालापासून त्या विद्यापीठाच्या व्हाइस चॅन्सेलर झाल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाने स्पृहणीय प्रगति केली असून आज विद्यापीठांत ७५०० विद्यार्थिनी शिकत आहेत. भारतांतील विद्यापीठाच्या बरोबरीचा दर्जा १९५१ सालीं महिलाविद्यापीठाला मिळाला.



*लेडी प्रेमलीलाबाई ठाकरसी*

फलटणचे राजेसाहेब श्रीमान् मालोजीराव नाईक निंबाळकर व राणीसाहेब सौ. लक्ष्मीदेवी नाईक निंबाळकर यांचें अण्णांच्या कार्यावर मनापासून प्रेम होतें. त्यांनी विविध प्रकारें हिंगणें संस्थेस मदत केली. १९३९ सालीं राजेसाहेबांनी फलटण येथे अण्णांचा वाढदिवस थाटाने साजरा केला. राणीसाहेब हिंगणें स्त्री-शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा १९४४ सालापासून आजतागायत वहात आहेत.



वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रमुख कार्यकर्त्यांशीं व विचारवंतांशीं संस्थेचे संबंध जिव्हाळ्याचे राखण्यांत अण्णा नेहमीच यशस्वी ठरले.



*नामदार श्रीनिवासशास्त्री, डॉ. कर्वे*



*श्री. न. चि. केळकर, डॉ. कर्वे*

जातिनिर्मूलनाला प्रोत्साहन देण्यासाठी अण्णा अशा समारंभांना हजर राहात.



*झुणकाभाकर सत्यनारायण*

५७ वर्षें अण्णांच्या कार्यांशीं एकरूप झालेली त्यांची सहचारिणी २९ नव्हेंबर १९५० रोजीं त्यांना सोडून गेली. बायाची समाधि हिंगणें येथे बांधली आहे. आता तिच्या शेजारींच अण्णांचा पुतळा उभारण्यांत आला आहे.





सौ. आनंदीबाई कर्वे



ही संस्था १९३६ सालीं स्थापन करून खेड्यांतील जनतेसाठी अण्णांनी कार्य चालविलें.



अण्णांचें मार्गदर्शन घेण्याकरिता अनेक समाजसेवक आस्थेने येत.



कुलकर्णी कर्वे, भागवत
महाराष्ट्र ग्राम-प्राथमिक-शिक्षण मंडळांतील कार्यकर्ते



*प्रा. रघुनाथ धोंडो कर्वे  जन्म १८८२ मृत्यु १९५३*



अण्णांप्रमाणेच समाज सुधारण्यासंबंधीचा ध्येयवाद व चिकाटी त्यांच्या ज्येष्ठ चिरंजीवांत पुरेपूर उतरली होती. रघुनाथरावांनी १९२१ सालापासून संततिनियमनाच्या कार्याला वाहून घेतलें आणि समाजाच्या टीकेला, उपहासाला व रोषाला तोंड देऊन एकट्याच्या बळावर १९२७ पासून सतत २६ वर्षे 'समाज-स्वास्थ्य' हें स्वतंत्र विचाराचें मासिक चालविलें.






*जातिनिर्मूलन संस्थेतील प्रमुख कार्यकर्त्यांसमावेत अण्णा*
*बसलेले : गोडबोले, जगताप, कर्वे, परांजपे*

मानवी समता व जातिनिर्मूलन यांचें कार्य अधिक वेगाने व्हावें अशी अण्णांना तळमळ वाटे.



१९५७ च्या स्वातंत्र्य समराची शताब्दि देशभर साजरी झाली. अण्णांच्या हस्तें पुण्यांतील शनवार वाड्यावर स्वातंत्र्य ध्वज उभारण्यांत आला.









# जन्मशताब्दि महोत्सव

१८ एप्रिल १९५८ रोजीं अण्णांच्या वयाला १०० वर्षें पूर्ण होत होतीं. हा महोत्सव थाटाने साजरा करावा असें देशभर पसरलेल्या त्यांच्या चाहत्यांनी ठरविलें.




अण्णांना १०० वें वर्ष लागलें त्या दिवशीं गौरव समितीचे अध्यक्ष मुंबईचे राज्यपाल डॉ. श्रीप्रकाश यांनी समितीच्या कार्याला जाहीरपणें सुरुवात केली.



रॉबर्ट मनी स्कूल, विल्सन कॉलेज व एल्फिन्स्टन कॉलेज या तीन संस्थांत अण्णांचें शिक्षण झालें. या तिन्ही संस्थांनी मिळून अण्णांचा सन्मान केला.








*मातृसंस्थांनी दिलेलें तबक २४ नव्हेंबर १९५७*

*मुंबई महानगरपालिकेने ८ मार्च १९५८ रोजीं दिलेल्या मानपत्राची चंदनी पेटी.*




मुंबई येथील कार्यक्रमासाठी भारताचे महामंत्री पंडित जवाहरलाल नेहरू व इतर खास पाहुणे जमले होते. शाही इतमामाने हा टोलेजंग समारंभ १८ एप्रिल १९५८ रोजीं ब्रेबर्न स्टेडियमवर साजरा झाला.




हिंगणें येथे १३ एप्रिल रोजीं थाटाचा समारंभ साजरा झाला. अण्णांच्या कर्मभूमींतील या अपूर्व समारंभाचें वैशिष्ट्य आगळेंच होतें.



महामंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीमुळें समारंभाला महत्त्व प्राप्त झालें होतें.



जन्मशताब्दि समितीतर्फे न्यायमूर्ति श्री. भा. ना. गोखले यांनी अण्णांना मानपत्र-करंडक अर्पण केला तेव्हा सर्वांच्या भावना उचंबळून आल्या.



अण्णांनी विधवेशीं विवाह केला म्हणून ज्या मुरूड गावांत ६५ वर्षांपूर्वी वादळ माजलें होतें त्याच गावाने आपल्या थोर सुपुत्राच्या जन्मशताब्दीचा उत्सव अत्यंत थाटाने साजरा केला.





# भाग्यवान् शतायुषी

जन्मशताब्दि समारंभानंतर कांही काळाने अण्णा हिंगणें येथेच राहूं लागले. आपल्या कर्मभूमींतील कार्याचा विकास पाहून कृतकृत्यतेचें समाधान त्यांच्या चेहऱ्यावर नेहमी दिसत असे.







हिंगणें संस्थेमधील शैक्षणिक कार्यांत सैनिकी शिक्षणाचा समावेश आहे.






एन्. डी. एस्. योजनेच्या द्वारें हिंगणें येथील विद्यार्थिनींनाहि राष्ट्रीय संस्कार लाभत असतात.



मुलींच्या सामुदायिक कवायतीचें स्फूर्तिदायक दृश्य म्हणजे गेल्या शंभर वर्षांत स्त्री-जीवनांत झालेल्या कायाकल्पाचा प्रत्यक्ष पुरावाच.

समृद्ध ग्रंथालय हें विद्यादानाचें एक प्रमुख अंग असल्याने त्याकडे हिंगणें संस्थेने काळजीपूर्वक लक्ष पुरविलें आहे.



गृहविज्ञानाचा अंतर्भाव मुलींच्या शिक्षणांत असावा
असा अण्णांचा सुरुवातीपासूनचा आग्रह होता.

*पाकशास्त्राचें प्रात्यक्षिक*



धुलाई विभाग – इस्त्री





स्त्री स्वावलंबी व्हावी ह्या हेतूनें हिंगणें येथें उद्यम मंडळातर्फें कांही वस्तूंची निर्मिति चालू असते.





हिंगणें येथे मुलींच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे कार्यक्रम आखण्यांत येतात. ते अण्णा उत्सुकतेने पहात.

हुतूतू



मैदानी व सांघिक खेळांत मुली उत्साहाने भाग घेतात.



लेजीम





बागकाम, नृत्य, संगीत, चित्रकला इत्यादि कार्यक्रम मुलींच्या जीवन-विकासाला लाभदायक ठरतात.



निष्ठावंत व ध्येयवादी सहकाऱ्यांमुळेच अण्णांचें स्वप्न साकार झालें व आजहि त्यांच्या कार्याची प्रगति अखंड चालू आहे.



सेवानिवृत्त व कार्यरत आजन्मसेवक ( १ जानेवारी १९५३)

बसलेले : देशपांडे, केळकर, मायदेव, पार्वतीबाई आठवले, अण्णासाहेब कर्वे, शेवडे, मोडक, आठवले, अण्णिगेरी

उभे : कर्वे, पालकर, कर्वे, मोघे, परांजपे, बर्वे, नातू, साठये, तांबोळे, अहो, गोळे, पतके




*शिशुविहारांतील समारंभाच्या प्रसंगीं*

## अखेर

अण्णांचें जीवन अखेरपर्यंत निरोगी राहिलें. शेवटचे दोन दिवसच ते अंथरुणावर होते. 'अनायासेन मरणम्' ही त्यांची इच्छा सफल झाली.






अण्णांच्या भोवतालचें जीवन झपाट्यानें बदलत होतें. त्याकडे अलिप्तपणानें पहावें म्हणून अण्णा रोज सायंकाळीं ५-१० मैल मोटारींतून हिंडून येत.




*महाराष्ट्र राज्य स्थापनेचा पुण्यांतील समारंभ*

शंभर वर्षे उलटल्यानंतरहि निरनिराळ्या सार्वजनिक समारंभांना ते आवडीने हजर राहात असत. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीमुळे ( १ मे १९६० ) त्यांना अतिशय आनंद झाला.



आपल्या पणतवंडांचे खेळ अण्णा कौतुकाने पहात.





अण्णांचें वाचन अखेरपर्यंत चालू होतें.

नीरा गौरी कुंदा

माधव वनविहारी निंबकर अरविंद जाई भास्कर नाना आनंद शंकर दिनकर वामन

हेमा शांता आठवले कावेरी सुशीला आठवले अण्णा रेवती इरावती सुमति



आपल्या कौटुंबिक जीवनांत अण्णा सुखी होते.

अण्णांचा १०५ वा वाढदिवस हिंगणें येथे अत्यंत उत्साहाने साजरा झाला. त्यावेळी कोणाला कल्पना नव्हती की हा त्यांचा अखेरचा वाढदिवस-समारंभ ठरेल.



27608

संध्याकाळच्या वेळी अण्णा व्हरांड्यांत बसले
की संस्थेमधील लहान मुली त्यांचेजवळ जमत.



शेवटच्या वर्षांत अण्णांना आपल्या पणतीचा फार लळा लागला होता.






मानवजातीच्या थोर सेवकाचें शरीर
प्रतिदिनी थकत चाललें होतें.



अण्णांची तटातूट होऊं नये असें त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या हजारों विद्यार्थिनींना वाटत होतें. 'अण्णां'शिवाय हिंगणें ही कल्पनाच असह्य होती.





आपल्या दीर्घ मानवी जीवनाचें सार्थक करून अण्णांनी आपली जीवनयात्रा समाधानांत संपविली. तो दिवस १८ कार्तिक १८८४ (९ नव्हेंबर १९६२). आज त्यांचा पार्थिव देह जरी अदृश्य झाला असला तरी त्यांच्या ध्येयवादी जीवनकार्याची ज्योत यापुढेहि आपणांस प्रकाश व स्फूर्ति देत राहील.

# जीवनपट

| | | |
|---|---|---|
| १८ एप्रिल | १८५८ | जन्म |
| | १८७३ | राधाबाईशीं विवाह |
| | १८७६ | मराठी ६ वीची परीक्षा उत्तीर्ण |
| | १८८१ | मॅट्रिक्युलेशन परीक्षा |
| | १८८४ | बी. ए. परीक्षा |
| | १८८५ | शिक्षक, एल्फिन्स्टन हायस्कूल |
| | १८८७ | एम. ए. परीक्षा ( अनुत्तीर्ण ) |
| | १८८८ – ९१ | शिक्षक, मराठा व इतर हायस्कुलें |
| | १८९१ | पहिल्या पत्नीचा मृत्यु |
| १५ नव्हेंबर | १८९१ – १९१४ | प्राध्यापक, फर्ग्युसन कॉलेज |
| ११ मार्च | १८९३ | आनंदीबाईशीं पुनर्विवाह |
| ३१ डिसेंबर | १८९३ | विधवाविवाहोत्तेजक मंडळीची स्थापना |
| २० ऑगस्ट | १८९५ | विधवा-विवाह-प्रतिबंध-निवारक मंडळी असा बदल |
| १४ जून | १८९६ | अनाथ-बालिकाश्रम मंडळीची स्थापना |
| १ जानेवारी | १८९९ | पुण्यांत आश्रमाची सुरुवात |
| जून | १९०० | आश्रमाचें हिंगण्यास स्थलांतर |
| ४ मार्च | १९०७ | महिला-विद्यालय स्थापना |
| ४ नव्हेंबर | १९०८ | निष्काम-कर्म-मठ स्थापना |
| डिसेंबर | १९११ | महिला-विद्यालयाचें हिंगण्यास स्थलांतर |
| डिसेंबर | १९१५ | राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे अध्यक्ष |
| ३ जून | १९१६ | महिला-विद्यापीठाची स्थापना |
| जून | १९१७ | अध्यापिकाशाळेची स्थापना |
| एप्रिल | १९१८ | पुणें कन्याशाळेची स्थापना |
| १८ एप्रिल | १९१८ | ६१ वा वाढदिवस |
| | १९२० | सर विठ्ठलदास ठाकरसींची देणगी |
| १८ एप्रिल | १९२८ | ७१ वा वाढदिवस |
| | १९२९ – ३० | त्रिखंड प्रवास |
| | १९३० – ३२ | आफ्रिकेचा प्रवास |
| | १९३६ | महाराष्ट्र-ग्राम-प्राथमिक शिक्षण मंडळाची स्थापना |
| १८ एप्रिल | १९३८ | ८१ वा वाढदिवस |
| | १९४४ | समता-संघाची स्थापना |

| | | |
|---|---|---|
| | १९४६ | अनाथ बालिकाश्रमाचा सुवर्णमहोत्सव व ' हिंगणें स्त्री-शिक्षण संस्था ' हें नामकरण |
| १८ एप्रिल | १९४८ | ९१ वा वाढदिवस |
| | १९४९ | श्री. ना. ना. ठा. महिला-विद्यापीठ कायदा |
| २९ नव्हेंबर | १९५० | बाया ( आनंदीबाई )चा मृत्यु |
| १९४२, १९५१, १९५४ | | डी. लिट्. पदवी, बनारस, पुणें व महिला-विद्यापीठ |
| | १९५५ | पद्मविभूषण पदवी |
| २३ ऑक्टोबर | १९५६ | हिंगणें स्त्री-शिक्षण संस्थेचा हीरक-महोत्सव |
| | १९५७ | एलएल. डी. पदवी, मुंबई विद्यापीठ |
| १८ एप्रिल | १९५८ | शताब्दिमहोत्सव, भारतरत्न पदवी |
| ९ नोव्हेंबर | १९६२ | मृत्यु |